महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पुने, बुधवार, दि. २४-०८-११
पुणे, बुधवार, दि. २४ ऑगस्ट २०११

# जमिनींची पुनर्मोजणी प्रामाणिकपणे व्हावी

लोकमत ऑन फेसबुक

- **अंकुश झांजे** – गरीब शेतकऱ्यांचा भांडखोरांपासून बचाव होईल.
- **सचिन पाटील** – तंटे निकाली निघतील. पण, काही वाद नव्याने उभे राहण्याची शक्यता आहे.
- **कृष्णा अंकुश** – चांगला उपक्रम हाती घेतलाय सरकारने. पण, यात पारदर्शकता हवी.
- **वनकुमार खंडेलवाल** – महसूल खात्याने वेळोवेळी हे करायला हवे.
- **गुरुनाथ नाकाडे** – आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून अशा बऱ्याच गोष्टी सुकर करता येण्यासारख्या आहेत.
- **आशिष ढाकणे** – सर्वांना त्यांच्या हक्काची जागा मिळेल.
- **गोपाळ दंडगवले** – अतिशय चांगला उपक्रम सरकारने हाती घेतलाय.
- **अर्जुन बागुल** – स्वार्थापोटी मोजणी टाळणाऱ्यांची आता डाळ शिजणार नाही.
- **संदेश सारंग** – महसूल विभागाने विशेषाधिकाराखाली खिरापत म्हणून वाटलेल्या जमिनी, सात–बारावर तलाठ्यांनी केलेले परस्पर फेरफार यातून आता उघड होतील.
- **सचिन महाजन** – जमिनीची नवीन मोजणी झाली तर वाद तर मिटतीलच; पण, महसूल विभागाला शेतकऱ्यांबद्दल संपूर्ण माहिती मिळेल.

## [ खुली चर्चा ]

**राज्यातील सर्व जमिनींची नव्याने मोजणी करून महसूल रेकॉर्ड अपडेट करण्यात येणार आहे. ही पुनर्मोजणी जमिनीच्या वादावरून होणारे तंटे रोखण्यासाठी पूरक ठरेल का? या प्रश्नावर झालेल्या चर्चेत ही पुनर्मोजणी प्रामाणिकपणे व्हावी, असे मत व्यक्त झाले.**

## कोणावरही अन्याय होऊ नये



**डॉ. भारत पाटणकर**
राष्ट्रीय अध्यक्ष, श्रमिक मुक्ती दल

जमिनींच्या वादावरून होणारे तंटे रोखण्यास जमिनींची पुनर्मोजणी पूरक ठरेल यात वाद असण्याचे कारण नाही; परंतु, ही पुनर्मोजणी होत असताना कोणावरही अन्याय होणार नाही, याची दक्षता कटाक्षाने घेणे आवश्यक आहे. जमीन नोंदणी दस्तांमध्ये वारस नोंदी होताना अनवधानाने झालेल्या आणि जाणीवपूर्वक केलेल्या गफलती, तलाठी स्तरावरच वारस नोंदी करताना झालेल्या चुका यामुळे आतापर्यंत हजारो कमकुवत सहहिस्सेदारांवर केवळ अन्यायच नव्हे, तर त्यांना हक्कांपासून वंचित देखील राहावे लागले आहे. राज्यातील पवनचक्क्यांकरिता जमिनी घेताना तसेच कोकणातील टाटा व रिलायन्ससारख्या खाजगी औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पांकरिता भूमी संपादनाची प्रक्रिया अंमलात आणताना सहहिस्सेदारांवर अन्याय झाल्याची अनेक उदाहरणे समोर आली.

## पुनर्मोजणीत पारदर्शकता असावी



**सेहजो सिंग**
कार्यकारी संचालक, नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडी

जमिनीच्या मोजणीमध्ये तलाठी नावाच्या भगवानावर आजवर सर्व काही अवलंबून होते. तो जी एक रेष आखे, ती महत्त्वाची ठरत असे. आजवर ज्यांनी याचा फायदा उठविला, त्यांचा याला विरोध होणार. मात्र, जमिनीची पुनर्मोजणी करताना ती पारदर्शक झाली पाहिजे. गावात ज्यांच्या नावाने जमीन आहे; पण, ते सध्या शहरात आहेत, अशांचीही नोंद झाली पाहिजे. शासन जमीन अधिग्रहीत करते, त्या वेळी लँडरेकॉर्ड व्यवस्थित नसल्यामुळे फटका बसला आहे. त्याचबरोबर प्रत्यक्ष जे जमीन कसतात, त्यांचीही नोंद होणे आवश्यक आहे.

## जमिनीच्या वादावरून होणारे तंटे रोखण्यासाठी पूरक पाऊल



**भास्कर मुंढे**
विभागीय आयुक्त, औरंगाबाद

राज्यातील सर्व जमिनींची नव्याने मोजणी करून महसूल रेकॉर्ड अपडेट करण्यात येणार आहे. ग्रामीण भागात बहुतांश भांडणे जमिनीच्या मालकीवरूनच होत असतात. तंटे रोखण्यासाठी राज्य सरकारचा हा निर्णय पूरक पाऊल ठरेल. या निर्णयामुळे जमीनविषयक तंटे-भांडणे-वाद कमी होतील. हा अतिशय योग्य निर्णय आहे. आता आधुनिक पद्धतीने मोजणी होणे आवश्यक आहे. कारण, जमिनीच्या मोजणीसाठी कर्मचाऱ्यांची कमतरता आहे; पण, आधुनिक पद्धतीने मोजणी झाल्यास नक्कीच फायदा होणार आहे.

# भूसंपादन विधेयक उद्योजकांच्या हिताचे

## वसुधा धगमवार यांचे मत

**पुणे** | दि. २४ (वार्ताहर)

**संसदेत** मांडलेल्या 'भूसंपादन विधेयका'तील मुद्दे उद्योजकांच्या हिताचे आहेत. या कायद्यात काही चांगल्या बाजूही आहेत; मात्र तरी सामाजिक संघटनांमध्ये चर्चा होऊन विधेयकाला अंतिम रूप दिले गेले पाहिजे, अशी भूमिका माजी न्यायाधीश वसुधा धगमवार यांनी आज व्यक्त केली.

'राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्रा'च्या वतीने 'भूसंपादन आणि जमिनीचे फेरवाटप' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते त्या वेळी त्या बोलत होत्या.

या वेळी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव, अध्ययन केंद्राच्या संचालिका सहजो सिंग, कार्यक्रम समन्वयक लता पी. एम. व जनार्थ संस्थेचे प्रवीण महाजन, नवसर्जन ट्रस्टच्या मंजुला प्रदीप, पर्यावरणतज्ज्ञ विजय परांजपे, सत्यबाबू बोस, जार्जम येते, जय मेहता, अतुल सुलाखे व विविध राज्यांतील सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

धगमवार म्हणाल्या, ''या विधेयकातील नवीन पुनर्वसन कायदा हा जमीनदार, जमीनमालक यांच्या फायद्याचा आहे. त्यामुळे या कायद्याचा परत विचार करणे गरजे आहे.''

अरुणाचल प्रदेशाचे सामाजिक कार्यकर्ते जार्जम येते म्हणाले, ''आदिवासींना त्यांच्याच मालकीची असणारी जमीन मालकीची आहे, हे दाखविण्यासाठी कायदा करण्याची आवश्यकता नाही.

आदिवासींच्या मते, सरकारने जर जमिनी संपादित केल्या, तर आम्हाला ओळख दाखवीण्यासाठी जमीन शिल्लक राहणार नाही. त्यामुळे आदिवासींच्या जमिनी संपादित करू नयेत.''

या वेळी बाबा आढाव म्हणाले, ''राज्य सरकारने केलेले पुनर्वसनाचे कायदे पुरोगामी स्वरूपाचे असल्याने येणाऱ्या नवीन विधेयकाबद्दल माहिती दिल्याशिवाय ते येऊ नये.''

परांजपे म्हणाले, ''उद्योगांसाठी जमिनी संपादित केल्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होऊन अनेक वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे वनीकरण असलेल्या जमिनी संपादित करू नयेत. जमीन संपादन करताना आदिवासी लोकांना विचारून, त्यांना सहभागी करून उद्योगधंद्यांसाठी जमिनींचे संपादन करावे.''

'जनादेश' या सामाजिक संस्थेचे पी. व्ही. राजगोपाल म्हणाले, ''शेतकऱ्यांसाठी भूसंपादन कायद्यापेक्षा भूसुधार कायदा करणे गरजेचे असल्याने त्यांनी जमिनी देताना पुनर्वसन झाल्याशिवाय देऊ नयेत. त्यापेक्षा भूसुधार करणे महत्त्वाचे आहे.''

आदिवासी दलितांवर जमिनी संपादित करताना अन्याय-अत्याचार केले जातात. मात्र, जमिनी संपादन करण्यासाठी कोणतेही अन्याय-आत्याचर केले जाणार नाहीत, याबाबत ग्वाही देणारे कायदे या विधयेकात असले पाहिजेत, असे मंजुला प्रदीप यांनी सांगितले.

आदिवासींच्या म्हणण्यानुसार, सरकारी व्यवस्था एका बाजूने जमिनी देते व दुसऱ्या बाजूने काढून घेत असल्याचे नंदुरबार येथील प्रतिभा शिंदे यांनी सांगितले.

सकाळ पुणे शहर TODAY

मंगळवार, ३० ऑगस्ट २०११

# देशभरातील चर्चेनंतरच भूसंपादन कायदा करा

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २९ : भूसंपादन आणि पुनर्वसन कायदा हा आदिवासी, दलित, अल्पभूधारक आणि भूमिहीन यांच्याशी निगडित आहे. त्यामुळे या घटकांना विचारात घेऊन, त्याविषयी देशभरात चर्चा घडवून आणल्यानंतरच हा कायदा केंद्र सरकारने अमलात आणावा, अशी ठाम भूमिका नागरिक आणि विविध संघटनांकडून नुकतीच मांडण्यात आली आहे.

'भूसंपादन आणि पुनर्वसन कायदा' या विधेयकावर नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, स्वयंसेवी संस्था व संघटना यांच्याकडून मते मागविण्यात आली होती. त्यासाठी 'राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्र' या संस्थेने राष्ट्रीय कार्यशाळेचे एस. एम. जोशी सभागृहात बुधवारी आयोजन केले होते. यात देशभरातील तज्ज्ञांनी सहभाग घेतला होता.

पी. व्ही. राजगोपाल, सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव, माजी न्यायमूर्ती वसुधा धागमवार, विजय परांजपे, प्रवीण महाजन, प्रतिभा शिंदे, अरुणाचल प्रदेशातील जार्जम ऐते, गुजरातमधील मंजुळा प्रदीप, जया मेहता, मिहीर देसाई व 'जनवकालत'चे सहजो सिंग, अतुल सुलाखे, लता प्रतिभा मधुकर यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रमुख या वेळी उपस्थित होते.

"भूसंपादन विधेयकात मोठ्या प्रमाणात संदिग्धता असून, ते विधेयक जमीनदार, मालक व बांधकाम व्यावसायिक यांच्या बाजूने झुकणारे आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांना विश्वासात घेतल्याशिवाय हे विधेयक अमलात आणू नये," अशी भूमिका धागमवार यांनी मांडली.

राजगोपाल म्हणाले, "आतापर्यंत अनेक वेळा भूसंपादन झाले; मात्र अनेकांचे पुनर्वसन झालेच नाही. अशा परिस्थितीत भूसंपादनाचा कायदा आणणे चुकीचे आहे. यात दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, अल्पभूधारक व भूमिहीन यांची भूमिका लक्षात घेतली पाहिजे. त्यानंतरच पुढील प्रक्रिया झाली पाहिजे."

"अरुणाचल प्रदेशमध्ये आदिवासींना केंद्रस्थानी ठेवणारा वनाधिकारी कायदा लागू करण्यात आला; परंतु त्याची योग्य अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे या राज्यातील प्रत्येकाचे मत विचारात घेतल्यानंतरच हा कायदा लागू करावा," अशी अपेक्षा जर्जाम ऐते यांनी केली.

या विधेयकातील सातही मुद्द्यांवर आधारित प्रस्ताव राष्ट्रीय 'जनवकालत'तर्फे ३० ऑगस्टपर्यंत केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. बाबा आढाव म्हणाले, "या कायद्यावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचा पुनर्वसन कायदा हा अतिशय पुरोगामी आहे. केंद्र सरकारचा कायदा होताना राज्याच्या कायद्यावर परिणाम होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे."